अर्जित रजा परिगणना करण्याच्या पध्दतीत सुधारणा.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय, क्रमांक अरजा-२४९०/१६१/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी, १९९१.

वाचा :-- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अरजा-२४८८/३९५/सेवा-९, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९०.

## शासन निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अरजा-२४८८/३९५/सेवा-९, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९० अन्वये राज्य शासकीय कर्मचा-यांच्या अर्जित व अर्धवेतनी रजा गणना करण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्यांत आला आहे. त्यानुसार प्रत्येक अर्धवर्षासाठी १ जानेवारी व १ जुलै रोजी प्रत्येक १५ दिवस याप्रमाणे अर्जित रजा आगाऊ जमा करण्याचे आदेश आहेत. यासंबंधात असे निदर्शनास आणण्यांत आले आहे की, अशा रितीने अर्जित रजा आगाऊ जमा केल्यामुळे व ती २४० या कमाल मर्यादेला सीमित केल्यामुळे आगाऊ रजा जमा करण्याची ही पध्दत काही कर्मचा-यांचे बाबतीत फायदेशीर न ठरण्याची शक्यता आहे. अशा कर्मचा-यांचे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे :--

[१] वर्षाच्या १ जानेवारी अथवा १ जुलै रोजी ज्या कर्मचा-यांच्या अर्जित रजा खाती २२५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी अर्जित रजा शिल्लक असेल त्यांच्या बाबतीत १५ दिवस अथवा जर ते पुढील अर्धवर्षामध्ये सेवानिवृत्त होणार असतील किंवा सेवा सोडून जाणार असतील तर ~~हक्क~~ यथाप्रमाण कमी अर्जित रजा त्यांचे खाती आगाऊ जमा करण्यांत यावी.

[२] वर्षाच्या १ जानेवारी किंवा १ जुलै रोजी ज्यांच्या खाती २४० दिवस किंवा त्यापेक्षा कमी परंतु २२५ दिवसांपेक्षा जास्त अर्जित रजा शिल्लक असेल ~~त्यांच्या~~ अशा प्रकरणी आगाऊ जमा करावयाची १५ दिवस अर्जित रजा स्वतंत्र दाखविण्यांत यावी आणि त्या अर्धवर्षामध्ये कर्मचारी जेवढी अर्जित रजा घेईल तेवढी अर्जित रजा अशा रितीने स्वतंत्र दाखविण्यांत आलेल्या १५ दिवसांच्या अर्जित रजेशी प्रथम समायोजित करावी. संबंधित अर्धवर्षामध्ये जर कर्मचा-याने १५ दिवसापेक्षा जास्त अर्जित रजा उपभोगिली असेल तर १५ दिवसांपेक्षा जास्त घेण्यांत आलेली रजा शिल्लक अर्जित रजेमधून वजा करण्यांत यावी. असे केल्यानंतर जी अर्जित रजा शिल्लक राहील ती कर्मचा-यांच्या अर्जित रजा खाती, २४० दिवसांच्या मर्यादेच्या अधिन राहून, अर्धवर्षाचे शेवटी जमा करण्यांत यावी.

**उदाहरणार्थ**

[१] जर १ जानेवारी, १९९१ रोजी कर्मचा-याच्या अर्जित रजा खाती २२५ दिवस अर्जित रजा शिल्लक असेल तर तो त्या अर्धवर्षामध्ये जर सेवानिवृत्त होणार नसेल तर त्याच्या रजा खाती १५ दिवस अर्जित रजा आगाऊ जमा करण्यांत येईल.

[२] दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी कर्मचा-याच्या रजा खाती २४० दिवस अर्जित रजा शिल्लक असल्यास आणि [अ] जर त्याने १ जानेवारी १९९१ ते दिनांक ३० जून, १९९१ या अर्धवर्षामध्ये १५ दिवस अर्जित रजा घेतली, तर घेतलेली अर्जित रजा दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी जमा करण्यासाठी म्हणून स्वतंत्र रित्या दाखविण्यात आलेल्या १५ दिवसांशी प्रथम समायोजित करण्यांत येईल. [ब] तथापि, जर त्याने दिनांक ३० जून १९९१ रोजी संपणा-या अर्धवर्षामध्ये फक्त १० दिवस अर्जित रजा घेतली तर दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी त्याच्या खाती जमा करण्यांत यावयाच्या १५ दिवस अर्जित रजेशी प्रथम ती समायोजित करण्यांत येईल व त्या व्यतिरिक्त शिल्लक राहिलेली ५ दिवस अर्जित रजा त्याच्या अर्जित रजा खाती जमा केली जाणार नाही. म्हणजेच दिनांक १ जुलै, १९९१ रोजी त्याच्या खाती २४० दिवस अर्जित रजा शिल्लक राहील.

[३] जर दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी कर्मचा-यांच्या रजा खाती २३० दिवस अर्जित रजा शिल्लक असेल आणि [अ] जर त्याने दिनांक ३० जून, १९९१ रोजी संपणा-या अर्धवर्षामध्ये १५ दिवस अर्जित रजा घेतली तर अशी रजा दिनांक १ जानेवारी १९९१ रोजी त्यांच्या रजा खाती जमा करावयाच्या १५ दिवसाच्या अर्जित रजेशी समायोजित करण्यांत येईल आणि दिनांक १ जुलै १९९१ रोजी त्याचे खाती २३० दिवसच अर्जित रजा शिल्लक राहील. [ब] जर त्याने या अर्धवर्षात फक्त १० दिवसांची अर्जित ~~रजेने~~ रजा घेतली तर ही रजा प्रथम त्याचे खाती दिनांक १ जानेवारी, १९९१ रोजी जमा करावयाच्या १५ दिवसांच्या अर्जित रजेशी समायोजित करण्यांत येईल आणि शिल्लक ५ दिवस अर्जित रजा त्याचे खाती जमा करण्यात येईल, म्हणजेच त्याचे खाती दिनांक १ जुलै १९९१ रोजी २३५ दिवस इतकी अर्जित रजा जमा होईल.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक अरजा-२४८८/३९५/सेवा-९, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९० मध्ये एखाद्या शासकीय कर्मचा-याने कॅलेंडर अर्धवर्षाच्या शेवटी सुरु होणारी परंतु पुढील कॅलेंडर ~~व~~ अर्धवर्षामध्ये संपेल अशी अर्जित रजा घेतली तर तिचा हिशोब कसा करण्यांत यावा हे त्या सोबत असलेल्या जोडपत्रा-मध्ये दर्शविण्यांत आले आहे. आता या शासन निर्णयामधील तरतुदी विचारात घेऊन, वरील जोडपत्रामध्ये दाखविण्यांत आलेल्या उदाहरणात या सोबतच्या जोडपत्राप्रमाणे बदल करण्यांत यावा.

३. वरील आदेश दिनांक १ जानेवारी १९९१ पासून अंमलात येतील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम १९८१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यांत येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ. ना. कुळकर्णी,
शासनाचे उप सचिव.

उदाहरण क्र. १ -- शासकीय कर्मचा-याच्या अर्जित रजा खाती २३६ दिवस अर्जित रजा शिल्लक आहे व त्याने दिनांक २४ डिसेंबर पासून २५ दिवसांची अर्जित रजा घेतली. त्याच्या अर्जित रजा खाती पुढीलप्रमाणे जमा/ खर्ची टाईल :--

| | | | |
|---|---|---|---|
| [अ] | दिनांक २३ डिसेंबर रोजी शासकीय कर्मचा-याच्या खाती शिल्लक अर्जित रजा. | २३६ दिवस | |
| [ब] | वजा दिनांक २४ ते दिनांक ३१ डिसेंबर पर्यन्त घेतलेली ८ दिवस अर्जित रजा. | [-] ८ दिवस | |
| | ३१ डिसेंबर रोजी शिल्लक अर्जित रजा | २२८ दिवस | |
| [क] | १ जानेवारी रोजी आगाऊ जमा करावयाची १५ दिवस अर्जित रजा | | [+] १५ दिवस |
| [ड] | १ जानेवारी ते ३० जून या कालावधीमध्ये घेतलेली अर्जित रजा [१जानेवारी ते १७ जानेवारी= १७ दिवस] | | [-] * १७ दिवस |
| | | | [-] २ दिवस |
| [इ] | शिल्लक अर्जित रजा. | * *२२६ दिवस | |

*[ १ जानेवारी ते १७ जानेवारी या कालावधीमध्ये घेतलेली अर्जित रजा १ जानेवारी रोजी आगाऊ जमा केलेल्या १५ दिवस अर्जित रजेशी प्रथम समायोजित केली आहे. ]

* *[ असे समायोजन केल्यानंतर घेतलेली अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात आलेल्या १५ दिवस अर्जित रजेपेक्षा जास्त येत असल्याने [२ दिवस] जास्तीची रजा ३१ डिसेंबर रोजी शिल्लक असलेल्या अर्जित रजेशी समायोजित केली आहे. ]

उदाहरण क्र. २ :-- शासकीय कर्मचा-याच्या अर्जित रजा खाती २४० दिवस अर्जित रजा शिल्लक आहे व त्याने ३० जूनपासून २९ दिवसांची रजा घेतली. त्याच्या अर्जित रजा खाती खालीलप्रमाणे जमा/खर्ची टाईल :--

| | | | |
|---|---|---|---|
| [अ] | दिनांक २९ जून रोजी शासकीय कर्मचा-याच्या खाती शिल्लक अर्जित रजा. | २४० दिवस | |
| [ब] | वजा ३० जून रोजी घेतलेली रजा. | [-] १ दिवस | |
| | ३० जून रोजी शिल्लक अर्जित रजा | २३९ दिवस | |
| [क] | १ जुलै रोजी आगाऊ जमा करावयाची १५ दिवस अर्जित रजा. | | [+] १५ दिवस |
| [ड] | १जुलै ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये घेतलेली अर्जित रजा. [१ जुलै ते २८ जुलै = २८ दिवस]. | | [-] *२८ दिवस |
| | | | [-] १३ दिवस |
| [इ] | शिल्लक अर्जित रजा | * *२२६ दिवस | |

* [१ जुलै ते २८ जुलै या कालावधीमध्ये घेतलेली अर्जित रजा १ जुलै रोजी आगाऊ जमा केलेल्या १५ दिवस अर्जित रजेशी प्रथम समायोजित केली आहे. ]

* *[असे समायोजन केल्यानंतर घेतलेली अर्जित रजा आगाऊ जमा करण्यात आलेल्या १५ दिवस अर्जित रजेपेक्षा जास्त येत असल्याने [१३ दिवस] ...
३० जून रोजी शिल्लक ...